

''विविध ठिकाणी निवडक जातींना आधी प्राधान्य द्यावे व पुढारलेल्या जातींचा नंतर विचार करावा...''

महात्मा जोतिराव फुले



''घरात सुद्धा अशक्त आणि लहान मुलांसाठी आई वेगळे दूध राखून ठेवते, हॉस्पिटलमधील नर्स अशक्तांना खास तो टॉनिक देते. याच न्यायाने राज्यकारभार करताना दुर्बल घटकांना खास न्याय द्यावा लागतो. पिढ्यानं पिढ्या अज्ञानात खितपत पडलेल्या मागास जातीतील उमेदवारांना हजारो वर्षे ज्ञानाची मक्तेदारी बाळगणाऱ्या उच्च जातीच्या स्पर्धेपासून वाचविण्यासाठी मी ही ५० टक्के राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली आहे.''

- राजर्षी शाहू महाराज

रूपी पब्लिकेशन्स प्रा. लि., गडहिंग्लज

आरक्षण वास्तव आणि विपर्यास

संपादक डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

# आरक्षण वास्तव आणि विपर्यास

संपादक

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर



ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. सुरेश वाघमारे यांच्या प्रस्तावनेसह..!



''प्रशासनात कोणत्याही एका जातीची एकाधिकारशाही असणे ही गोष्ट अहितकारक आहे.''

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आरक्षण वास्तव आणि विपर्यास

(Aarakshan Vastav ani Viparyas)

संपादक : डॉ. ज्ञानराजा चिघळीकर

© प्रकाशक व संपादक

आवृत्ती : प्रथम आवृत्ती - १४ एप्रिल २०२५
(भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती)

ISBN Number : 978-93-94710-18-4

प्रकाशक : रूपी पब्लिकेशन्स प्रा. लि.
'समता' 385/42 मोर्डी कॉलनी, काळभैरी रोड,
गडहिंग्लज जि. कोल्हापूर.
Email: rupipublications@gmail.com
मोबाईल: 9822651377

मुद्रक : सेल्फ हेल्प इंटरप्रायजेस, धायरी, पुणे.

अक्षरजुळणी : श्री. प्रविण साळुंखे.
ज्ञानज्योत प्रोडक्शन, कोल्हापूर मो.बा. 9665650632.

मूल्य : रु ४९९/-

सदर पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनाने फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या पुस्तकातील सर्व मतमतांतरे लेखकांची आहेत. त्यास प्रकाशक व संपादक जबाबदार राहणार नाहीत.

## भाग – तीन

## फुले-शाहू-आंबेडकर, भारतीय संविधान आणि आरक्षण

अ.क्र लेखाचे नाव व लेखक पान.क्र

१. अनुसूचित जातींचे वर्गीकरण, क्रिमीलेअर आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका
- अनिल वैद्य........................................ १६९ ते १७८

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आरक्षणातून राष्ट्र निर्मितीकडे
- डॉ. ह. नि. सोनकांबळे........................................१७९ ते १८७

३. बहुजनांच्या आरक्षणाचे जनक: लोकराजा राजर्षी शाहू
- डॉ. व्ही. आर. सोनी........................................१८८ ते १९६

४. आरक्षण धोरण आणि भारतीय संविधान
- डॉ. महादेव मुंढे........................................१९७ ते २०६

५. भारतीय संविधान आणि आरक्षण
- प्रा. डॉ. शेख गफूर अहमद........................................२०७ ते २१८

६. फुले-शाहू-आंबेडकर यांचा आरक्षण विषयक दृष्टीकोन
- डॉ. ज्ञानराजा चिघळीकर........................................२१९ ते २२५

## भाग – चार

## आरक्षण संकीर्ण

१. आरक्षण वास्तव आणि अपेक्षा
- प्रा. डॉ. पी. एस. कांबळे........................................२२६ ते २३८

२. आरक्षण आणि खाजकीरण
- चंद्रकांत बावकर........................................२३९ ते २४७

**डॉ. ज्ञानराजा चिघळीकर** – ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज अर्थशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

# फुले- शाहू- आंबेडकर यांचा आरक्षण विषयक दृष्टीकोन

आरक्षण हा सध्यस्थितीत भारतातील सर्वाधिक चर्चेचा विषय बनला आहे. महाराष्ट्रातील मराठा, गुजरात मधील पटेल आणि उत्तर प्रदेशातील जाठ समुदाय गेली अनेक वर्षे रस्त्यावर उतरून आरक्षणासाठी आंदोलन करीत आहे. भारतीय संविधानानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास जाती (ओबीसी) यांना शिक्षण, नोकरी, पदोन्नती आणि राजकीय आरक्षण मिळाले असले तरी, ओबीसी समुदायाला त्याच्या संखेच्या प्रमाणात आरक्षण मिळाले नाही. तसेच इम्पिरीकल डेटा उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये असालेले राजकीय आरक्षण सुद्धा संपुष्टात आले आहे. अनुसूचित जाती-जमाती आरक्षणाचा बॅकलॉग स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही भरला जात नाही. उलट सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार त्यांच्यामध्ये उप-वर्गीकरण व क्रीमिलेयर तत्व लागू करण्याची जोरदार तयारी सुरु आहे. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण हवे आहे तर, ओबीसी समाज त्याला विरोध करीत आहे. अशा परिस्थितीत ज्यानी आरक्षणाचे तत्वज्ञान मांडले त्या महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहूमहाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आरक्षण विषयक दृष्टीकोन समजून घेणे महत्वाचे आहे.

भारतामध्ये सर्वप्रथम आरक्षणाची सुरुवात मनुस्मृतीने केली. मनुस्मृतीचा अध्याय एक आणि श्लोक ८७ ते ९१ नुसार "या विश्वाचा देवाधिदेव ब्रह्मदेव याने आपल्या मुखातून ब्राह्मणाला, बाहुतून क्षत्रियाला, मांडीतून वैश्याला आणि पायातून शूद्राला जन्माला घातले असून...